## महत्त्वाचे

### संग्रामनगर रस्त्याचे लोकार्पण

औरंगाबाद : संग्रामनगर, सातारा परिसर येथील संकल्प पार्क येथील सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्याचे लोकार्पण आ. संजय शिरसाट, नगरसेवक सिद्धांत शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी हरिभाऊ हिवाळे, रमेश बाहुले, कैलास पाटील, संजय भुजबळ, मनोज सोनवणे, रंजित पवार, उज्वल राजूरवाल, रामेश्वर पेंढारे, रंजित ढेपे, अजिंक्य गायकवाड, संजीवन सरोदे, रऊफ पटेल, वासंकर काका आदींची उपस्थिती होती.

### लोकविद्याधरांची मागणी

औरंगाबाद : भारतात ८५ टक्के समाज लोकविद्याधर आहे. त्याला त्याच्या स्वत:च्या पारंपरिक व्यवसायाचे संपूर्ण ज्ञान असते. परंतु त्याचे उत्पन्न मात्र किमान वेतनापेक्षाही कमी असते. सरकारने या लोकविद्याधरांना दरमहा किमान २२ ते २३ हजार रु. मासिक उत्पन्न उपलब्ध करुन दिले पाहिजे, अशी मागणी लोकविद्या ज्ञान पंचायततर्फे करण्यात आली आहे. यासंदर्भात पत्रपरिषदेत निर्मला देवरे ( इंदोर), सुमेरसिंग राठोड (इंदोर), नारायणराव (हैदराबाद), गिरीश सहस्त्रबुद्ध ( नागपूर), डॉ. कृष्ण राजलू ( हैदराबाद), संजीव किर्तने ( इंदोर) यांनी लोकविद्याची मांडणी करुन वरील मागणी केली.

### आज लाक्षणिक उपोषण

औरंगाबाद: भिल्ल समाजातील युवक रामकिसन ठाकरे यास गावगुंडांनी जिवे मारले. आरोपींकडून त्याच्या परिवाराला जिवे मारण्याच्या धमक्या देण्यात येत आहेत. गुंडांचा बंदोबस्त करावा, कुटुंबाला संरक्षण द्यावे, यासाठी २३ नोव्हेंबर रोजी विभागीय आयुक्तालयासमोर मयताची पत्नी हिराबाई ठाकरे कुटुंबासह लाक्षणिक उपोषण करणार आहे, अशी माहिती डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे राज्य सरचिटणीस सुरेश चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी महिला जिल्हाध्यक्षा आशा बागडे, हिराबाई ठाकरे, वडार फोरमचे टी.एस. चव्हाण उपस्थित होते.

मसिआ : 'अॅडव्हान्टेज महाराष्ट्र एक्सपो'चे आयोजन

# औरंगाबादला बनवू 'मल्टी प्रॉडक्ट सिटी'

औरंगाबाद : शहराची ओळख 'ऑटो हब' म्हणून आहेच, ती ओळख केवळ 'ऑटो हब' म्हणून न राहता या शहराला 'लोकल टू ग्लोबल' विविध उत्पादने निर्माण करणारी 'मल्टी प्रॉडक्ट सिटी' म्हणून ओळख मिळावी. यासाठी मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अॅण्ड अॅग्रिकल्चर (मसिआ) या लघुउद्योजक संघटना, पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने ५ ते ८ जानेवारी २०१७ दरम्यान 'अॅडव्हान्टेज महाराष्ट्र एक्सपो:२०१७' या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंगळवारी पत्रकार परिषदेत देण्यात आली.

**प्रदर्शनात काय असेल...**

◆ ऑटोमोबाईल, इंजिनिअरिंग, प्लास्टिक, फार्मा, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक, आयटी, कृषी आधारित उत्पादने, अन्नप्रक्रिया उद्योग, बँका, शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक सेवा पुरविणाऱ्या संस्थांचा सहभाग प्रदर्शनात असेल. ३०० ते ३५० स्टॉल्स प्रदर्शनात सहभागी होतील. प्रदर्शनादरम्यान इंजिनिअरिंग एक्सलन्स, रिनिव्हेबल एनर्जी, अॅग्रो अॅण्ड फूड प्रोसेसिंग या विषयावर परिसंवाद होतील. उद्योजक, व्यापारी, प्रगतिशील शेतकरी, शालेय, अभियांत्रिकी, आयटी, एमबीएचे विद्यार्थी, उद्योग करू इच्छिणाऱ्यांनी या प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन मसिआने केले आहे.

चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील पर्यटन विभागाच्या कलाग्राम परिसरात हे प्रदर्शन भरविण्यात येणार असून उद्घाटनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू, केंद्रीय उद्योगमंत्री कलराज मिश्रा, विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, उद्योगमंत्री सुभाष देसाई, पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांच्यासह शहरातील लोकप्रतिनिधींची उपस्थिती असेल.

२००५ व २०१० मध्ये महाव्हेंड, २०११ मध्ये ग्लोबल महाराष्ट्र ट्रेड फेअर, २०१४ मध्ये अॅडव्हान्टेज महाराष्ट्र या प्रदर्शनांचे आयोजन मसिआने केले होते. पत्रपरिषदेला मसिआचे अध्यक्ष विजय लेकुरवाळे, निमंत्रक भारत मोतिंगे, संतोष कुलकर्णी, अर्जुन गायके, एमटीटीसीचे प्रादेशिक अधिकारी अण्णासाहेब शिंदे यांच्यासह संघटनेच्या प्रतिनिधींची उपस्थिती होती.

**८०० कोटींच्या उलाढालीचे लक्ष्य**

मसिआने आजवर केलेल्या इंडस्ट्री इंटिग्रेटेड वर्कमुळे ४५० कोटी रुपयांपर्यंत लघुउद्योजकांची उलाढाल होण्यापर्यंत मजल गेली. यावर्षीपासून पुढे ८०० कोटींपर्यंत ही उलाढाल व्हावी, अशी संघटनेला अपेक्षा आहे. डीएमआयसीमुळे आंतरराष्ट्रीय उद्योग येणे प्रस्तावित आहे. त्या उद्योगांना स्थानिक पातळीवरच रॉ मटेरियल घेण्याचे निर्बंध आल्यास स्टार्टअप आणि मेक इंडियाचे उद्दिष्ट साध्य होईल, असे मसिआच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले, तर या प्रदर्शनात २० ते ३० टक्के स्टॉल कलावस्तुंसाठी आरक्षित असतील. २०१७ हे वर्ष 'व्हिजिट महाराष्ट्र' म्हणून घोषित करण्यात आले असून प्रदर्शनामुळे उद्योग आणि पर्यटनास चालना मिळणे अपेक्षित असल्याचे एमटीडीसीचे अधिकारी शिंदे म्हणाले.



पदाधिकारी... अॅडव्हान्टेज महाराष्ट्र एक्सपो २०१७ प्रदर्शनाच्या आयोजनाची माहिती दिल्यानंतर एकत्रित आलेले मसिआचे पदाधिकारी.

# हैं तय्यार हम...

Aurangabad Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
11 Dec 2016

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Powered by MK CONSTRUCTIONS CREATIONS FOR LIFETIME AN ISO 9001:2015 CERTIFIED COMPANY



मी धावणार माझ्यासाठी

लोकमत आयोजित औरंगाबाद मॅरेथॉन हा एक अतिशय चांगला उपक्रम राबविण्यात येत असून, मी या मॅरेथॉनमध्ये सहभागी होणार आहे. स्वस्थ व निरोगी आयुष्यासाठी जास्तीत जास्त महिलांनी या मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे.

-डॉ. चारुशिला देशमुख



औरंगाबाद जिल्हा माहेश्वरी सभा, माहेश्वरी मंडळ, महेश वरिष्ठ नागरिक संस्था... रमेशचंद्र दरक, अनिल सोनी, शिवप्रसाद तोतला, संतोष लखोटिया, अॅड. सुभाष मालानी, किशोर बजाज, संजय सारडा, सत्यनारायण साबू, शिवनाथ राठी (बसलेले) अरुण राठी, सतीश लड्डा, रमेश सोनी, रमेश जाजू, नितीन भक्कड, संतोष बाहेती, जितेंद्र झंवर.

Co-Sponsors
RAJURI STEEL | SARA INSPIRED BY YOU | श्री धनेश्वरी शैक्षणिक संकुल, स्थापना वर्ष : १९९५, गेवराई तांडा, पैठण रोड, औरंगाबाद | VANSH GROUP REALITY BEYOND EXPECTATION
Powered by YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner RELAX-ZEAL | Mall Partner PROZONE | Food Partner KREAMN KRUNCH | Outdoor Partner abhishek advertising & marketing (i) pvt.ltd | Partners blueumbrella

**नाव नोंदणी व सहभागासाठी**

www.mycitymarathon.com वर ऑनलाईन प्रवेशिका भरु शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४०-६६०४५०२

# 'बीओटी'ला मनपा आयुक्तांचा ब्रेक!

ठोस निर्णय : अर्धवट प्रकल्प गुंडाळण्याचे आदेश; गुंतवणूक केलेल्या मंडळींचे धाबे दणाणले

औरंगाबाद : महापालिकेने मोठा गाजावाजा करुन शहरात बांधा वापरा आणि हस्तांतरित करा (बीओटी) या तत्त्वावर कोट्यवधी रुपयांच्या जमिनी मोठमोठ्या उद्योजक आणि संस्थांना ९९ आणि ३० वर्षांच्या करारावर दिल्या आहेत. यातील काही प्रकल्प पूर्ण झाले काही अर्धवट आहेत. अर्धवट असलेले सर्व प्रकल्प गुंडाळण्याचे आदेश मंगळवारी मनपा आयुक्त ओम प्रकाश बकोरिया यांनी दिले. आतापर्यंत जे प्रकल्प पूर्ण झाले आहेत, त्यातूनही फारसे आर्थिक तथ्य मनपासमोर आलेले नाही. याचाही फेरआढावा घेण्याचे आदेश त्यांनी दिले. आयुक्तांच्या या निर्णयामुळे कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केलेल्या मंडळींचे धाबे दणाणले आहेत.

**औरंगपुऱ्यात शॉपिंग कॉम्प्लेक्स**

◆ औरंगपुरा भाजीमंडई पाडून ही जागा बीओटीवर खाजगी व्यावसायिकाला देण्यात आली. मागील तीन वर्षांपासून हा प्रकल्प रखडला आहे. या जागेच्या मालकी हक्कावर मनपाचेच नाव नाही. प्रकल्प विकसित करणाऱ्याला मनपाने बांधकाम परवानगीच दिलेली नाही. कंत्राटदाराने या जागेवर अत्यंत धोकादायक असा ३0 फूट खोल खड्डा करुन ठेवला आहे. आयुक्तांच्या निर्णयाने आता हा प्रकल्प गुंडाळावा लागणार आहे.

मंगळवारी सकाळी मनपा आयुक्त ओम प्रकाश बकोरिया यांनी सर्व विभागप्रमुखांची बैठक घेतली. या बैठकीत विभागनिहाय विविध कामांचा आढावा घेण्यात आला. बीओटीच्या कामांचा आढावा घेताना आयुक्तांनी नमूद केले की, कोट्यवधी रुपयांच्या जमिनी खाजगी व्यक्तींना दिल्यानंतरही मनपाला जेवढे उत्पन्न मिळायला हवे तेवढे मिळत नाही. असे प्रकल्प त्वरित आहे त्या परिस्थितीत रद्द करा. मनपाने आतापर्यंत ज्योतीनगर येथे जलतरण तलाव, रेल्वेस्टेशन, शहानूरमियाँ दर्गा येथे बीओटी प्रकल्प पूर्ण केले आहेत. वसंत भुवन येथील प्रकल्पही अर्धवट आहे. शहागंज येथील बीओटीवर प्रकल्प सुरुच झाला नाही. सिद्धार्थ उद्यान, औरंगपुरा, वसंत भुवन येथे खाजगी व्यावसायिकांनी कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. आता त्यांचा हा पैसा पाण्यात जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दहा वर्षांपूर्वी बीओटीचे वारे जोरदारपणे वाहत होते. या उपक्रमात सिद्धार्थ उद्यान येथे फूट प्लाझा उभारण्यासाठी कोट्यवधी रुपयांची जागा खाजगी उद्योजकाला देण्यात आली. मागील दहा वर्षांमध्ये हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. बीओटीतील मनपाच्या वाट्याला आलेली पार्किंग बांधण्यात आली आहे. आता हा प्रकल्प आहे त्या स्थितीत गुंडाळावा लागणार आहे.

# जीवनाच्या निखळ आनंदाचा कानमंत्र

सखी मंच : ताण व्यवस्थापन कार्यशाळा

औरंगाबाद : दैनंदिन जीवनातील ताण कमी करण्यासाठी सखी मंचच्या वतीने मनशक्ती केंद्राच्या सहकार्याने 'ताण व्यवस्थापन आणि कार्यक्षमता वृद्धी' या कार्यशाळेचे २५ नोव्हेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे.

लोकमत भवनातील लोकमत लॉनवर सायंकाळी ४ वाजता ही कार्यशाळा होणार आहे. सध्याच्या या प्रचंड स्पर्धेच्या जगाला सामोरे जाताना आपल्यापैकी प्रत्येकाला रोजच अनेक मानसिक ताणतणावांना सामोरे जावे लागते. कामाच्या ठिकाणी असणारा ताण तसेच कौटुंबिक कलह यांच्यामुळे अनेक जण जीवनाचा आनंदच हरवून बसतात.

सध्याच्या युगात ताणमुक्त असणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. कौटुंबिक ताण, व्यावसायिक ताण, राजकीय ताण, मुलांचे ताण, आर्थिक ताण असे असंख्य तणाव आपल्याला बेजार करतात. या ताणांचे अत्यंत घातक असे परिणाम आपल्या मेंदूवर, मनावर आणि शरीरावर होत असतात. या कार्यशाळेत ताणाची कारणे, परिणाम आणि ताण व्यवस्थापनाचे विविध उपाय याविषयी मयूर चंदणे मार्गदर्शन करतील. जीवनाचा निखळ आनंद मिळवून देण्यात ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे.

**लोकमत सखी मंच**

◆ हा कार्यक्रम विनामूल्य असून सखी मंच सदस्या या कार्यक्रमात सहभागी होऊ शकतात. दि. २५ नोव्हेंबर रोजी सायं. ४ वा. लोकमत लॉन, लोकमत भवन येथे हा कार्यक्रम होईल. प्रवेश मागील गेटने.

## वाणिज्य वार्ता



यशस्वी विद्यार्थ्यांसोबत प्रा. रामदास गायकवाड, कालिंदा गायकवाड, सरव्यवस्थापक नंदकुमार दंदाले, मुख्याध्यापिका शिल्पा कपूर आदी.

### गायकवाड ग्लोबल स्कूलचे यश

औरंगाबाद : मुंबई विज्ञान शिक्षक संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत गायकवाड ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले.

इयत्ता सहावीतील २६ पैकी २४ विद्यार्थी होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत प्रमाणपत्रासाठी पात्र झाले, तर दोन विद्यार्थ्यांची पुणे येथे होणाऱ्या पुढील प्रात्यक्षिक कार्यशाळेसाठी निवड झाली. परीक्षेत विद्यालयातून क्षितिज सहाने, यश फरकटे, पूर्वा पाटील, धनश्री अंतरकर, पूर्वा बडे, श्रीवत्स पांडे, गायत्री ताकटे, हर्षदा पाटील, आदित्य कासोद, अजिंक्य नगरकर, सिद्धेश जावरे, श्रेया कुलकर्णी, प्रतीक्षा नवपुते, अस्मिता अहिरे, भूषण छल्लानी, कृष्णा जावरे, यश राजपूत, उत्कर्ष कदम, तन्वी वैद्य, भूमी लुणिया, मृणाल माकोने, ओम पाठक, तेजस्विनी शेटे, कल्याणी जोगदंड या विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

गायकवाड एज्युकेशन ग्रुपचे संचालक प्रा. रामदास गायकवाड, स्कूल संचालिका कालिंदा गायकवाड, सरव्यवस्थापक नंदकुमार दंदाले, मुख्याध्यापिका शिल्पा कपूर, समन्वयक सोनिया माथारू यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### हर्सूल परिसरात 'हेरिटेज वॉक'

औरंगाबाद : ऐतिहासिक महत्त्व असलेल्या शहरातील विहिरींचे संवर्धन, पुनरुज्जीवन केल्यास नवीन पर्यटन स्थळांची जनतेला ओळख होईल. यातून शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही काही प्रमाणात सुटेल, असा आशावाद इतिहास अभ्यासक रमजान शेख यांनी व्यक्त केला. हर्सूल रोडवरील ऐतिहासिक नहर-ए- अंबरी परिसरात शनिवारी सकाळी सात वाजता हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले होते.

# खंडपीठाजवळील अतिक्रमणे हटविली

औरंगाबाद : मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाशेजारील रस्त्यावर असलेली अतिक्रमणे मंगळवारी मनपाच्या अतिक्रमण हटाव पथकातर्फे काढण्यात आली. मनपाच्या सर्वसाधारण सभेत या भागातील अतिक्रमणांवर अनेकदा चर्चाही झाली होती.

**टी.व्ही.सेंटर येथेही कारवाई**


◆ रस्त्यावर खाद्यपदार्थ विकणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याची घोषणा मनपाने सोमवारी केली होती. मंगळवारी सायंकाळी टी.व्ही. सेंटर भागात १५ पेक्षा अधिक खाद्यपदार्थ विकणाऱ्यांचे साहित्य जप्त करण्यात आले. दररोज सायंकाळी ५ ते रात्री ९ वाजेपर्यंत ही कारवाई सुरु ठेवण्यात येणार आहे. ही कारवाई इमारत निरीक्षक बावस्कर यांनी केली.

वाहतुकीस अडसर ठरणारी लहान मोठी आठ ते दहा अतिक्रमणे हटविण्यात आली. त्याचप्रमाणे साईड मार्जिनमध्ये एका नोटरीचे दुकान थाटण्यात आले होते. हे दुकानही निष्कासित करण्यात आले. बेसमेंटमध्ये गोडावूनची जागा असताना तेथे दुकाने उघडण्यात आली होती. या गोडावूनलाही सील ठोकण्यात आले. यावेळी पदनिर्देशित अधिकारी सी. एम. अभंग, इमारत निरीक्षक बावस्कर, आर.एस. राचतवार, नगररचनाचे कनिष्ठ अभियंता बाळासाहेब शिरसाठ आदींची उपस्थिती होती.

शहानूरमियाँ दर्गा परिसरातील कब्रस्तानातून मनपाला ड्रेनेज लाईन टाकायची होती. या भागात काही अतिक्रमणे आणि भिंत तोडायची होती. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवून ही कारवाई करण्यात आली. स्थानिक नागरिकांनी या कारवाईला विरोध दर्शविला होता. एस.एस. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

### पत्रकार संरक्षण कायद्याची मागणी

औरंगाबाद : लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या माध्यमांच्या प्रतिनिधींवर सातत्याने हल्ले होत आहेत आणि म्हणून पत्रकार संरक्षण कायदा तातडीने अस्तित्वात आला पाहिजे अशी मागणी शौर्य युथ फाऊंडेशनने केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना नुकतेच निवेदन सादर करण्यात आले. त्यावर संकेत नवगिरे, अक्षय जोशी, मयूर दिवटे, सलमान मुजीब खान, सागर जाधव, नीलेश पाईकडे, विवेक जोशी, सोहेल पटेले आदींच्या सह्या आहेत.



डॉ. होमी भाभा परीक्षेत यश मिळविणाऱ्या नारायणा इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांसोबत डॉ. एम. एफ. मल्लिक, प्रो. विशाल लदनिया आदी.

### 'नारायणा'चे होमी भाभा परीक्षेत यश

औरंगाबाद : वाढत्या स्पर्धात्मक युगात शालेय जीवनातच डॉ. होमी भाभासारख्या स्पर्धात्मक परीक्षेने विद्यार्थ्यांमध्ये जिद्द निर्माण होते. जिद्दीने केलेले प्रयत्न निश्चित यशस्वी होतात, असे प्रतिपादन 'नारायणा'चे संचालक डॉ. एम. एफ. मल्लिक यांनी केले.

होमी भाभा परीक्षेत संस्थेच्या फाऊंडेशन बॅचमधील (वर्ग ९ वा) यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्काराप्रसंगी ते बोलत होते. या परीक्षेत आदित्य केंद्रे, क्रितिका झनझन, वरद मनियार, प्रतीक जाधव, अनुराग पांडे, यश म्हस्के, प्रज्योत जाधव, संचित काबरा, अथर्व मोहिते, सिया निजवान, संस्कृती दुबे, मुग्धा पांडे, सौरव देशमुख, ओमकार घलक, प्रतीक सरकटे या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. याप्रसंगी वर्ग ७ ते १० वीच्या विद्यार्थी व पालकांसाठी 'नारायणा'तर्फे २७ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता संत तुकाराम सिडको नाट्यगृहात चर्चासत्र आयोजित करण्यात आल्याची माहिती प्रो. विशाल लदनिया यांनी दिली.

# महापालिकेचे 'उत्पन्न' वाढवा!

आयुक्तांचा इशारा : मालमत्ता कराकडे लक्ष द्या

औरंगाबाद : मनपा आयुक्त ओम प्रकाश बकोरिया यांनी शहरातील प्रत्येक वॉर्डात १ कोटी रुपयांची विकासकामे करण्याची घोषणा केली आहे. मागील सहा महिन्यांपासून मनपाच्या तिजोरीत येणाऱ्या आर्थिक स्त्रोताकडे बघितले असता विकास कामांसाठी ११५ कोटी रुपये मिळणे शक्य नाही. त्यामुळे विकासकामांना कात्री लावावी लागणार आहे. उत्पन्न वाढविण्यासाठी अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष्य द्यावे, असे आदेश त्यांनी मंगळवारी एका बैठकीत दिले.

२४ नोव्हेंबरनंतर मालमत्ता कर भरणारे नागरिक पैसे भरणार नाहीत. त्यामुळे मनपाला पुन्हा एकदा आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागणार आहे. आतापासून वसुलीवर लक्ष्य केंद्रित करा अशा सूचना त्यांनी दिल्या. मालमत्ता कर न भरणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांची यादी तयार करुन त्यांना नोटिसा पाठवा. पैसे न मिळाल्यास मालमत्तांना सील ठोका, भोगवटा प्रमाणपत्र न घेणाऱ्यांची यादी तयार करुन त्यांना नोटिसा पाठविण्यात याव्यात. तीन पट दंड लावून पैसे वसूल करा, असेही त्यांनी नगररचना विभागाला सांगितले. नगररचना विभागाने एक सॉफ्टवेअर तयार करावे. बांधकाम परवानगी कोणी कधी घेतली. संबंधिताने भोगवटा प्रमाणपत्र घेतले किंवा नाही, हे सुद्धा त्वरित निदर्शनास आले पाहिजे. ज्या शैक्षणिक संस्थांनी अग्निशमन एनओसी घेतली नाही, त्यांच्यावर कारवाई करा. सेव्हन हिल येथील अंबरवाडीकर पेट्रोल पंपावर कारवाई करा असे आदेशही त्यांनी दिले. अनधिकृत मोबाईल टॉवर्सची संख्या बरीच आहे. याचा शोध घेण्यात यावा. एकाच टॉवरवर तीन ते चार कंपन्या ग्राहकांना सेवा देत आहेत. कंपन्यांची ही चालबाजी शोधून काढावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालय : भूसंपादन विषयीच्या लवादाचे कामकाज हाताळणार

# आणखी एक अप्पर आयुक्त मिळणार

स.सो. खंडाळकर ● औरंगाबाद

येथील विभागीय आयुक्त कार्यालयास लवकरच आणखी एक अप्पर विभागीय आयुक्त मिळणार आहे. सध्या गोविंद बोडखे हे अप्पर आयुक्त असून ते शेतीविषयक प्रकरणे हाताळीत असतात. दुसरे अप्पर आयुक्त करमणूक शुल्काच्या कामकाजासह अर्धन्यायिक कामकाज व राष्ट्रीय महामार्गाच्या अनुषंगाने भूसंपादन विषयीच्या लवादाचे कामकाज हाताळतील. आयुक्तालयात १७ कोटी खर्च करुन सुसज्ज सभागृह उभारण्याचा प्रस्तावही शासनाने मंजूर केला आहे.

**२५ विषयांचे जीआर आले...**

◆ या प्रतिनिधीशी बोलताना विभागीय आयुक्त डॉ. उमाकांत दांगट यांनी सांगितले की, गेल्या ४ ऑक्टोबर रोजी औरंगाबादेत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत एकूण ५0 विषयांवर चर्चा झाली होती. त्यापैकी २५ विषयांचे जीआर निघाले आहेत. २0 विषयांना मंत्रिमंडळ बैठकीमुळे गती मिळाली आहे. विशेषत: सिंचनाचे प्रकल्प गतिमान झाले आहेत.

◆ मंत्रिमंडळ बैठकीने मराठवाड्यासाठी खूप दिलेले आहे. बैठक होण्यापूर्वी पंधरा दिवस मंत्रालय मराठवाड्याच्या प्रश्नांवर काम करीत होते. आता एक- एक निर्णयाचे जीआर निर्गमित होत आहेत, ही अत्यंत आनंदाची बाब होय.





◆ मराठवाड्याने मानसिक मागासलेपण काढून टाकण्याची गरज आहे. मराठवाड्याचा विकास जनतेलाच करावा लागेल. त्यासाठी सर्वांनी राजकीय मतभेद विसरुन एकत्र येण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

यासंबंधीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त डॉ.उमाकांत दांगट यांनी शासनाकडे पाठवला होता. त्यास ४ ऑक्टोबर रोजी औरंगाबादेत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली होती. विविध कायद्यांतर्गत प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणे अविलंब निकाली काढण्यासाठी आणखी एका अप्पर आयुक्तांची नितांत आवश्यकता होती. विभागीय आयुक्त कार्यालयातील अप्पर जिल्हाधिकारी संवर्गातील उपायुक्त(करमणूक शुल्क) हे मंजूर पद अप्पर जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) या संवर्गात उन्नत करुन त्यास अप्पर विभागीय आयुक्त म्हणून पदनिर्देशित करण्यात यावे व त्या पदास करमणूक शुल्काच्या कामकाजासह अर्धन्यायिक कामकाज व राष्ट्रीय महामार्गाच्या अनुषंगाने भूसंपादन विषयीच्या लवादाचे कामकाज सोपविण्यात यावे असा हा प्रस्ताव विभागीय आयुक्तांनी पाठवला होता. तसेच १ एप्रिल २०१७ पासून विभागीय आयुक्त कार्यालयातील करमणूक शाखेतील एक अव्वल कारकून संवर्गातील पदाची श्रेणीवाढ करुन नायब तहसीलदार संवर्गात एक पद निर्माण करण्याची बाबही शासन विचाराधीन होती. त्यासंबंधीचाही जीआर आता निघाला आहे.

नवनिर्मित अप्पर आयुक्तांच्या कार्यालयाकरिता सध्या करमणूक शुल्काच्या कामकाजासाठी विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात उपलब्ध असलेला कर्मचारी उपयोगात आणण्यात येईल.



राज्यस्तरीय युवा उद्योजक पुरस्कार स्वीकारताना सदाशिव पाटील. याप्रसंगी डॉ. एन. एम. मालदार, दीपक आर्वे, डॉ. संतोष भोसले, संजय पवार, अनिल घारुळे, विनोद वारद.

### सदाशिव पाटील यांना युवा उद्योजक पुरस्कार

औरंगाबाद : अविष्कार फाऊंडेशन कोल्हापूरच्या वतीने २०१६ च्या विशेष राज्यस्तरीय युवा उद्योजक पुरस्काराने द्वारकादास शामकुमारचे संचालक सदाशिव दशरथ जाधव पाटील यांना सन्मानित करण्यात आले. सोलापूर येथे शिवछत्रपती रंगभवन नाट्यमंदिरात सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. एम. मालदार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी राज्य गुप्तवार्ता विभागाचे उपअधीक्षक दीपक आर्वे, प्रांताधिकारी रघुनाथ पांढारे, शिक्षण अधिकारी अशोक भांजे, फाऊंडेशनचे अध्यक्ष पत्रकार संजय पवार, डॉ. संतोष भोसले, प्रा. अनिल घारुळे, विनोद वारद आदी उपस्थित होते.